“डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय पत्रकारिता एक चिकित्सक अभ्यास ”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्या शाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी पदवीकरिता सादर करावयाचा

संशोधन आराखडा

संशोधक

धम्मपाल एकनाथराव उघडे

(एम.एस्सी,एम.ए,एम.एड,सेट)

सहशिक्षक

जि.प.प्रा.शाळा नामदेव नगर पाथरी जि.परभणी

मार्गदर्शक

प्रा.डॉ. पंडीत शिवराम लांडगे

(एम.ए, बी.एड, एम.फिल, पी.एच.डी)

सहाय्यक प्राध्यापक

तथा राज्यशास्त्र विभागप्रमुख

के.के.एम.महाविद्यालय, मानवत

जि.परभणी

मार्च-२०२२

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय पत्रकारिता एक चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेला १९२० मध्ये प्रारंभ झाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर निश्चित भूमिकेतूनच पत्रकारितेकडे वळले होते. आपली बाजू मांडण्यासाठी वृत्तपत्रासारखे प्रभावी माध्यम नाही, याची डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जाणिव होती. त्यांच्या मते अंधाऱ्या रात्री गस्तवाल्याचे किंवा महानगरपालीकेच्या कंदिलाचे जे काम तेच वृत्तपत्रांनी आपले काम समजले पाहिजे. समाजात घडणाऱ्या प्रत्येक घेटनेचे प्रतिबिंब वृत्तपत्राच्या माध्यमातुन उमटावे अशी किमान अपेक्षा लोकांची असते मराठी पत्रकार सृष्टीत समाजमन घडवण्यात आगरकर, टिळक, महात्मा फुले, दिनबंधुकार कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील यांची नावे घेतले जातात. या प्रत्येकाची पत्रकारीता विशिष्ट ध्येयाने प्रभावित झालेली होती. पत्रकारितेचा इतिहास अभ्यासतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांत चैतन्य निर्माण करण्याचे काम केले. ३१ जाने १९२० रोजी मुकनायक या पाक्षिकाचा जन्म झाला मुकनायक पाक्षिकाचा जन्म झाला तेंव्हा लोकमान्य टिळक हयात होते. मुकनायक जाहिरात केसरीत छापण्यास नकार देण्यात आला होता. परंतू डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नेटाने या पाक्षिकाचे मुहुर्तमेढ रोवली आमच्या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास वृत्तपत्र महत्वाचे आहे. आपण एक पत्र का काढत आहोत यांची स्पष्ट भूमीका डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अग्रलेखात मांडली होती. मुकनायक मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ लेख लिहिले होते. ५ जुलै १९२० रोजी ते परदेशात गेले व ३ एप्रिल १९२३ मध्ये परत मायदेशात आले. पण त्यांच्या पश्चात मुकनायक बंद पडले त्यानंतर १९२७ मध्ये बहिष्कृत भारत हे पत्र त्यांनी जन्माला घातले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनीने आज पुर्ण देश चालत आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्वाच्या आधाराव देशाची एक विट रचली जाते. तेव्हां खरोखर लिखाणाची ताकद दिसून येते.

समाज प्रबोधन घडवून आणण्या बरोबरच उपेक्षित समाजात राजकिय जागृती घडवून आणण्याचे काम डॉ.बाबासाहेबांनी वृत्तपत्रांच्या माध्यमाने केले.

या नंतर २४ नोव्हेंबर १९३० रोजी जनता वृत्तपत्राचा प्रथम अंक प्रकाशित झाला. जनता प्रारंभी पाक्षिक होते. ३१ ऑक्टोबर १९३१ रोजी ते साप्ताहिक झाले. या वृत्तपत्राची बिरुदावली म्हणुन, ञ्गुलामाला ,तु गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करुन उठेल.ङङ हे वाक्य होते.

डॉ.बाबासाहेब यांनी चार वृत्तपत्रे सुरु केली. त्यापैकी मुकनायक आणि बहिष्कृत भारत या दोन वृत्तपत्रांचे संपादक स्वतः डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. आणि त्यातला बहुतांश मजकुरही त्यांनी स्वतःच लिहिला. डॉ.बाबासाहेबांना बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र करायचे नव्हते तर बहिष्कृत समाजाच्या चळवळीचे मुखपत्र बनावयाचे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उपेक्षित जातीजमातींच्य राजकीय हक्कांसाठी त्यांना त्यांचे अधिकार मिळवून देण्यासाठी वृत्तपत्रांचा वापर केला. अस्पृशांचे म्हणणे, त्यांच्या समस्या जगाच्या वेशिवर टांगण्यासाठी आपल्याजवळ एखादे साधन असावे असे त्यांना वाटत होते. इतर उपलब्ध वृत्तपत्र विशिष्ट जातींचीच चाकरी करणारी होती. असे त्यांना वाटल्यामुळेच ते पत्रकारिते कडे वळल मराठी पत्रकारितेच्या इतिहासात तीन मुख्य प्रवाह राहिले आहेत. एक राजकीय स्वातंत्र्याची पत्रकारिता, दुसरी समाज सुधारणेची पत्रकारिता आणि तिसरी मानव मुक्तीची पत्रकारिता होय. राजकीय स्वातंत्र्याची पत्रकारिता ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची समाज बदलण्याची आणि बंडखारेवृत्तीची होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपला तोल जाऊ न देता अतिशय सुसंस्कृतपध्दतीने आणि निर्भीडपणे लेखन केलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही मानव मुक्तीची पत्रकारिता होती. त्यांचे लेखन हे प्रखर बुध्दीवादी आणि तर्कसंग ज्ञानधर्मी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रामुख्याने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणुन जगात ओळख आहे. भारताची राज्य घटना जगात आदर्श राज्य घटना समजली जाते. डॉ.बाबासाहेब आंबडकर हे अष्टपैलु व्यक्तीमत्वाचे होते. धर्मशास्त्राच्या अभ्यासक , अर्थशास्त्राचे अभ्यासक ,कामगार

नेते,राजकीय पक्षाचे संस्थापक दृष्टे विचारवंत, विविध सामाजिक चळवळीचे जनक आणि या बरोबरच त्यांची पत्रकारिता आजही प्रेरक ठरेल अशीच आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे निश्चित भूमिकेतून पत्रकारितेकडे वळले होते. १९१७ साली विविध जाती जमातीच्या मतदानाच्या अधिकारांच्या संदर्भात काही कर्त्या व्यक्तींच्या साक्षी काढण्यासाठी शासनाने साऊथबरो कमिशन नेमले होते. या कमिशनच्य निमीत्ताने अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांसाठी झगडण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. अस्पृशांचे म्हणणे जगापुढे मांडण्यासाठी आपल्या जवळ नेहमी साठी एखादे साधन असावे त्यांना वाटले. समाजात विचार प्रवत्त करण्यासाठी वृत्तपत्रांची गरज असते हे त्यांना तिव्रपणे जाणवत होते. बालविवाहाचे फलित, ब्राम्ह्याणांचे स्वरुप, वर्णाश्रमाचा प्रभाव, मंदिर प्रवेश, मातंग समाज सत्याग्रह, आर्यसमाजाचे कार्य, सत्यशोधक चळवळीचा ध्येयवाद, मजुर पक्ष, सायमन कमिशन इत्यादी अनेक विषयांवर डॉ.बाबासाहेबांनी लिखाण केले.

राजकीय पत्रकारिता ही पत्रकारितेची एक विस्तृत शाखा आहे. ज्यात राजकारण आणि राज्यशास्त्राच्या सर्व पैलुंचा समावेश आहे. राजकीय पत्रकारितेचा हेतू आहे की मतदारांना त्यांचे स्वतःचे मत तयार करण्यासाठी आणि त्यांना प्रभावित करणाऱ्या समुदायिक, स्थानिक किंवा राष्ट्रीय बाबीमध्ये सहभागी होण्यासाठी माहिती प्रधान करणे. आज राजकीय पत्रकारिता वेगवेगळया माध्यमाद्वारे प्रिंन्ट,ब्रॉडकास्ट किंवा ऑनलाईन रिपोर्टिंद्वारे व्यक्त होत आहे ती राजकारण,प्रचार, कार्यक्रमाच्या बातम्या आणि उमेदवारांसाठी एक व्यासपीठ प्रधान करते. राजकीय बातम्या आणि पत्रकारितेतील अचुकता मतदारांना लोकशाही प्रक्रियेत अधिक सहभागी होण्यास सक्षम करु शकते. मतदारांना घडणाऱ्या घटनांचे साक्षीदार आणि प्रेक्षक होण्याऐवजी मतदारांनी माध्यमांची भूमिका प्रभावी करण्यास मदत करते. त्यांना निश्चित दृष्टीकोन तयार करण्यास सहाय्यक ठरते.

संशोधन विषयाचे महत्व:-

प्रस्तुत संशोधन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय पत्रकारिता या विषयांशी संबंधीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपण भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणुन ओळखतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यघटनेचे फक्त शिल्पकारच नव्हते या राज्यघटनेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी सर्व सामान्य जनतेने ही देशाच्या राजकारणात सहभागी व्हावे. प्रत्येकाने आपले विचार माडांवेत. फक्त प्रेक्षक न होता निर्भीडपणे राजकीय घडामोडींवर व्यक्त व्हावे त्यासाठी प्रयत्न करीत होते. लोकांच्या मतांना वाचा फोडण्यासाठी वृत्तपत्रासारखे माध्यम नसल्याची जाणीव त्यांना होती. ही जाणीव असल्यामुळेच त्यांनी मुकनायक, प्रबुध्द भारत , जनता या सारखी वृत्तपत्रे चालविले. या सर्व बाबींचा विचार करता पत्रकारिता ही लोकशाहीला मजबुत करण्याची महत्वाची भूमीका पार पाडत असल्याचे दिसून येते यामुळेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेचा अभ्यास करणे महत्वाचे वाटल्यामुळे प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय विचारांचा आढावा घेतानाच त्यांनी पत्रकार म्हणुन भारतीय लोकशाहीच्या विकासाठी दिलेल्या योगदानाचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यांनी चालविलेल्या वृत्तपत्र साप्ताहिक, पाक्षिके यांच्या माध्यमातून मांडलेले विचार आणि त्यांच्या विचारांचा भारतीय उपेक्षित वर्गामध्ये निर्माण केलेल्या जागृतीचा विचार करता वृत्तपत्रांचे राजकारणातील महत्व अभ्यासण्यात येणार आहे.

संशोधन पध्दती :-

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनासाठी वेगवेगळया संशोधन पध्दतीचा विषयाच्या स्वरुपानुसार वापर करण्यात येत असतो. विश्लेषणात्मक, तुलनात्मक, वर्णनात्मक अशा विविध पध्दतीने कार्य पार पाडले जात असते. प्रस्तुत संशोधन विषयाचे स्वरुप पाहता. या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अशा दोन्ही पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

तथ्य संकलन :-

संशोधनात तथ्यांचा शोध घेणे अनिवार्य आहे. संशोधन विषयाच्या संबधित वस्तुनिष्ठ तथ्यांचे संकलन करणे महत्वाचे आहे. प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित तथ्य संकलीत करण्याचे प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात येणार आहे.

प्रस्तुत संशोधन विषयांचे स्वरुप पाहता प्रश्नावलींचा वापर सयुक्तीक ठरणार नाही. त्यामुळे बाबासाहेबांना जवळुन ओळखनाऱ्या वरिष्ठ नागरिक , पत्रकार यांच्याकडुन मुलाखत अनुसुचिचा उपयोग करुन तथ्थ संकलीत करण्यात येणार आहे.

दुय्यम साधनांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चालविलेले वृत्तपत्रे पाक्षिके, साप्ताहिके, यांचा अभ्यास करत असतांनाच त्यांच्यावर लिहिली गेलेली संदर्भ ग्रंथ पुस्तके यांचा आधार घेवुन तथ्थ संकलित करण्यात येणार आहेत.

संशोधनाची उद्दिष्टे :-

कुठलेहि संशोधन कार्य विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवुन केले जात असते. त्या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी प्रयत्न केले जातात. प्रस्तुत संशोधनासाठी देखील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्राचा थोडक्यात आढावा घेणे.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, राजकीय कार्याचा अभ्यास करणे.

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय लोकशाही प्रगल्भ करण्यासाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकार म्हणुन उदयाच्या पार्श्वभुमीचा अभ्यास करणे.

५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चालविलेल्या विविध वृत्तपत्रे, साप्ताहिके यांचा अभ्यास करणे.

६. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चालविलेल्या विविध वृत्तपत्रे, साप्ताहिके यांच्या माध्यमातून भारतीय लोकशाहीच्या प्रगल्भतेसाठी लोकांमध्ये झालेल्या जागृतीचा अभ्यास करणे.

७. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय पत्रकारितेचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :-

सामाजिक शास्त्रांमध्ये संशोधन करत असतांना गृहितकांची मांडणी केली जात असते.गृहितके ही संशोधनाची अनुमाने असतात. या अनुमानांना गृहित धरुन संशोधनासाठी आवश्यक तथ्थांचे संकलन करणे सोयचे जात असते. तसेच संशोधनाला एक निश्चित दिशा मिळण्यास मदत होत असते. प्रस्तुत संशोधनासाठी काही गृहितके निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. डा. बाबासाहेब आंबेडकर यांनी उपक्षित वर्गाला राजकीय प्रवाहात आणले.

२. डा. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या पत्रकारितेतून भारतीय लोकशाहीला मजबुत करण्याचे काम केले.

३. डा. बाबासाहेब आंबेडकर यांनी चालवलेल्या वृत्तपत्रांमुळे उपेक्षित सर्व सामान्य वर्ग आपल्या राजकीय हक्का प्रती जागृत झाला.

४. डा. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजीक व राजकीय कार्याला गती देण्यासाठी पत्रकारितेत प्रवेश केला.

५. डा. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रखडपणे भारतीय समाजव्यस्था, राज्यव्यवस्थेवर विचार मांडले.

प्रकरणाची रचना :-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासाठी खालील प्रकारणांमध्ये विभागणी करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले :- प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयांची थोडक्यात ओळख करुन देण्यात येणार आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाचे महत्व , संशोधन पध्दती, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके यांची मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन परिचय

प्रस्तुत दुसऱ्या प्रकरणात संशोधन विषय हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय पत्रकारितेशी संबंधीत असला तरी संशोधन विषयांची गरज म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्राचा थोडक्यात आढावा घेणे गरजेचे असल्यामुळे या प्रकरणात त्यांनी आपल्या कारकिर्दीत ज्या परिस्थितीतून समाज परिवर्तनाचा लढा उभारला देशाची राज्यव्यस्था मजबुत करण्याचे कार्य केले. त्या पार्श्वभूमीचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, राजकीय विचार आणि कार्य

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय पत्रकारितेचा आढावा घेण्यापुर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या सामाजीक आणि राजकीय कार्याचा भाग म्हणुन तसेच हे कार्य प्रभावीपणे पार पडावे म्हणुन पत्रकारितेत प्रवेश केलेला आहे. त्यामुळे त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याचा थोडक्यात आढावा प्रस्तुत प्रकणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय पत्रकारिता

प्रस्तुत प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पत्रकारितेतील प्रवेश अभ्यासतांना त्यांनी आपल्या कारकिर्दीत चालवलेल्या विविध वृत्तपत्रे, पाक्षिके, साप्ताहिके यांचा आढावा घेत असतांना त्यांनी भारतीय लोकशाही मजबुत करण्यासाठी सर्व सामान्यांचा राजकीय प्रवेश व्हावा यासाठी आपल्या पत्रकारितेला राजकीय पत्रकारितेची जोड दिलेली होती. सर्वसामान्य, उपेक्षि लोकांमध्ये राजकीय जागृती घडवुन आणण्यासाठी प्रयत्न केले होते. वृत्तपत्राव्यतिरिक्त दुसरे कुठलेहि प्रभावी माध्यम राजकीय जागृती घडविण्यासाठी नाही. याची त्यांना जाणिव असल्यामुळेच त्यांनी लोकांना राजकीय प्रकीयेत सक्रीय प्रवेश करण्यास प्रवृत केले. या सर्व बाबींचा सविस्तर आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे :- निष्कर्ष आणि समारोप

प्रस्तुत प्रकरणात संपुर्ण संशोधनाचा आढावा घेवुन तथ्थ संकलन करुन, तथ्यांच्या विश्लेषनातुन पुढे आलेल्या निष्कर्षांची मांडणी करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनाचा थोडक्यात सारांश मांडण्यात येणार आहे.

संदर्भग्रंथ सुची :-

मराठी संदर्भ

१. पानतावणे गंगाधर, पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे १९९६

२. हिवराळे सुखराम, लोकपत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, प्रचार प्रकाशन, कोल्हापुर १९९०

३. क्षीरसागर आर.के. भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन औरंगाबाद १९७९

४. मोरे शेषेराव, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक धोरण एक अभ्यास, राजहंस प्रकाशन पुणे १९९८

५. भोळे भा.ल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर वैचारिक वारसा, सुगावा प्रकाशन, पुणे १९९८

६. पानतावणे गंगाधर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता, नंदीता प्रकाशन औरंगाबाद

७. पवार दया, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबइ १९९३

८. पंडितनलीनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर (पहिली आवृत्ती १९९५) ग्रंथाली प्रकाशन दादर मुंबई १६

९. भंडारे संजय आर मानवतेचे निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर विनिमय पब्लीकेशन विक्रोळी (प.) मुंबई ८३

१०. कसबे रावसाहेब, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्य घटना (तृतीय आवृत्ती) सुगावा प्रकाशन पुणे ३०

इंग्रजी संदर्भ ग्रंथ :-

1. Jatava D.R. The Political Philosophy of Dr. Ambedkar, Phoneix Pubilication, Agra, 1965

2. Lokhande G.S. Bhimrao Ramji Ambedkar A Study in Social Democracy, Intellectual Publ, New Delhi, 1982

3. Baym Geoffrey, The Daily Show, Discursive Integration and the reivention of Political Journalalism, Political Journalism Journal, 2005

4. B. Shivarao, (Editor) , The Framing of India' Constitution,(Select Document) vol. one.

5. B. Shivarao, (Editor), The Framing of India' Constitution,(Select Document) vol. Two.

6. Vidyasagar I.S. Indian Freedom Movement and Dr. B.R.Ambedkar (Edition 2011) ABD Publishers, Jaipur, Rajasthan (India)

7. Kashyap subhash, Constiturion making since 1950 vol. 6,Universal Law, Publishing co. New Delhi .2

8. M Laxmikant Indian Polity

संशोधक

धम्मपाल एकनाथराव उघडे
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा नामदेव नगर
ता.पाथरी जि.परभणी

मार्गदर्शक

प्रा.डॉ.पंडीत शिवराम लांडगे
सहाय्यक प्राध्यापक
तथा राज्यशास्त्र विभागप्रमुख
के.के.एम. महाविद्यालय, मानवत जि.परभणी